रे. कि.केस कं. 1/2018
नि.कं.

: न्या य नि र्ण य :
( दिनांक 30 जानेवरी, 2018 रोजी जाहीर केले )

1. प्रस्तुतची चौकशी अधिकारी उपनिरीक्षक श्री. एम.बी. घोलप, रेल सुरक्षा बल, पनवेल यांनी आरोपी याचेविरुद्ध रेल संपत्ती बेकायदेशीरपणे बाळगणे कलम 3(अ) प्रमाणे दाखल केलेली आहे. आज आरोपीस हजर केले असता त्याने गुन्हा कबूल केला आहे. दोषारोपपत्रामध्ये नमूद केलेल्या कलमाखालील गुन्हा आरोपीला कबुल असल्यामुळे नि.5 कडे दोषारोप ठेवला. आरोपीने स्वतःहून गुन्हा कबूल केला तसे निवेदन नि. 6 कडे दिले. आरोपीने गुन्हा कबुली स्वखुशीने केल्याबाबत मी खात्री केली. सरकारी वकील तसेच आरोपीचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले.

2. रेल्वे मालमत्ता बेकायदेशीरपणे बाळगणे कलम 3(अ) मधील तरतूदींप्रमाणे आरोपीने केलेला गुन्हा हा त्याचा पहिला गुन्हा असेल तर त्याला पाच वर्षापर्यंत शिक्षा होउ शकते अथवा दंड होउ शकतो अथवा दोन्ही होउ शकतात. मात्र शिक्षा देताना न्यायालयाने आरोपीला विशेष कारणांशिवाय एक वर्षापेक्षा कमी शिक्षा व रक्कम रू.1000/– पेक्षा कमी दंड करू नये अशी तरतुद आहे.

3. आरोपीने रेल्वे संपत्तीची चोरी केल्याने त्यास अपराधी परिविक्षा अधिनियमाखालील तरतूदींचा लाभ देणे उचित होणार नाही. तसेच, तो 17. 11.2017 पासून कारागृहात असल्याने व चोरीचे रेल्वे मालमत्ताचे मुल्य फक्त रू.2000/– आहे. तसेच, सदरचा गुन्हा त्याचा पहिला गुन्हा असल्याचे व संपुर्ण कुटुंबाची त्याच्यावर जबाबदारी असल्याचे त्याने कथन केले असल्याने, सदरचे कारण त्याला एक वर्षापेक्षा कमी शिक्षा करण्यास पुरेसे आहे. त्याप्रमाणे खालीप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :

## : आ दे श :

1. आरोपी शेल्लीमोहन दिवाकर नायर याला रेल्वे मालमत्ता बेकायदेशीरपणे बाळगणे कलम 3 (अ) प्रमाणे दोषी ठरविण्यात येते.
2. आरोपीला रेल्वे मालमत्ता बेकायदेशीरपणे बाळगणे कलम 3 (अ) या गुन्हयासाठी 3 महिने सक्त मजूरी कारावासाची शिक्षा व रू.2000/— द्रव्य दंडाची शिक्षा आणि दंड न भरल्यास सात दिवस साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येते.
3. आरोपीने न्यायालयीन बंदी असतांना जेवढी शिक्षा भोगली तेवढया कालावधीची आरोपीला फौजदारी प्रकिया संहिता कलम 428 प्रमाणे सुट देण्यात येते.
4. निकालपत्राची छायांकित प्रत विनामुल्य त्वरीत आरोपीला देण्यात यावी.
5. जप्त मुद्देमाल रेल्वे संपत्ती अपील कालावधीनंतर रेल्वे प्रशासनास परत करण्यात यावी.
6. खटल्याचा निकाल खुल्या न्यायालयात दिला.

कल्याण.

( दि.ज. कळसकार )
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, लोहमार्ग न्यायालय,
कल्याण.

दिनांक : 30.01.2018.